**स्थायी निदेश क्र. १५**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (४) अन्वये जिल्हाधिकारी यांनी द्यावयाच्या मंजुरीबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र. आयएनएस १००२/प्र.क्र.१८/२००२/कार्या-६**
**दिनांक : ०५ मार्च, २००२**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे वतीने नगरपरिषदांच्या घेण्यात आलेल्या सन २०००-२००१ या वर्षाचे प्रशासकीय कामांचे तपासणीचे वेळी परभणी नगरपरिषद, उस्मानाबाद नगरपरिषदांच्या अर्थसंकल्पास जिल्हाधिका-यांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (४) अन्वये मंजुरी दिलेली नसल्याचे आढळुन आलेले आहे. अशीच परिस्थिती अन्य नगरपरिषदांचे संदर्भातही असू शकेल.

०२. उक्त अधिनियमातील कलम १०१ (४) च्या परंतुकामध्ये पुढीलप्रमाणे तरतुद विशद करण्यात आलेली आहे. नगरपरिषदेने कर्ज घेतले असेल किंवा खुल्या बाजारात किंवा अन्य रितीने उभारलेल्या कोणत्याही कर्जाबद्दल शासनाने हमी घेतली असेल तेव्हा नगरपरिषदेचा अर्थसंकल्प जिल्हाधिका-यांची आगावू मंजुरी घेवून स्विकारण्यात येतो. तसेच जिल्हाधिकारी काटेकारपणे संचालकांच्या या बाबतीतल्या सर्वसाधारण किंवा विशेष निदेशानुसार मंजुरी देतील.

परंतु आणखी असे की, पहिल्या परंतुकातील कोणत्याही मजकुरामुळे नगरपरिषदेस वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये किंवा अर्थसंकल्प मंजूर करण्यात येईपर्यंत या दोहोपैकी जी आधीची असेल त्या मुदतीत आपल्या नगरपरिषद निधीतुन मंजुर करण्यात आलेल्या आस्थापनेचा खर्च व आकस्मिक खर्च करण्यात प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.

०३. वरील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांची मंजुरी मिळेपर्यंत नगरपरिषदा फक्त ३ महिने मुदतीपर्यंत आस्थापना व आकस्मिक खर्च या व्यतिरिक्त अन्य प्रकारे खर्च करु शकत नाहीत. तथापि वरील नगरपरिषदांनी अर्थसंकल्प जिल्हाधिका-यांकडुन मंजुरी प्राप्त करुन न घेता संपुर्ण वर्षभर खर्च केलेला असुन सदरहू नगरपरिषदेची कृती हि वैधानिक तरतुदीचा भंग करणारी आहे. तसेच जिल्हाधिका-यांनी त्यांचेवर असलेल्या वैधानिक जबाबदारीनुसार अर्थसंकल्पास विहित मुदतीत मंजूरी देणे ही अत्यावश्यक बाब असूनही त्यांचेकडे त्यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

०४. वर विशद केलेली परिस्थिती यापुढे निर्माण होवु नेय म्हणून व जिल्हाधिका-यांनी नगरपरिषदांचे अर्थसंकल्पास विहित मुदतीत मंजुरी द्यावयाची असलेली वैधानिक गरज विचारात घेवुन असे निदेश देण्यात येत आहेत की

(अ) मुख्याधिका-यांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व आद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (१) व १-अ नुसार अर्थसंकल्प विहित मुदतीत तयार करावा.

(ब) नगरपरिषदेने उक्त अधिनियमांचे कलम १०१ (५) मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या निधीची तरतुद अर्थसंकल्पात असल्याची खातरजमा करुनच अर्थसंकल्पास कलम १०१ (४) नुसार २७८ फेब्रुवारी पूर्वी मान्यता द्यावयाची आहे.

(क) नगरपरिषदेचा अर्थसंकल्प प्रतीवर्षी मार्चच्या पहिल्या सप्ताहात आवश्यक त्या सर्व प्रपत्रांसह जिल्हाधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी मुख्याधिकारी यांनी (उक्त अधिनियमाचे कलम १०१ (४) नुसार) सादर करावयाचा आहे.

(ड) मुख्याधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे अर्थसंकल्प मंजुरीचा प्रस्ताव उशीरा सादर केल्यास त्याची जबाबदारी वैयक्तिकरित्या मुख्याधिका-यांवर राहील.

(इ) उक्त अधिनियमाचे कलम १०१ (४) अन्वये जिल्हाधिका-यांकडे मंजुरीसाठी दाखल झालेल्या अर्थसंकल्प मंजुरीचे प्रस्तावावर जिल्हाधिका-यांनी एक महिन्यात निर्णय घ्यावा.

(प) उक्त अधिनियमाचे कलम १०१ (४) नुसार जिल्हाकारी यांची मंजुरी प्राप्त होईपर्यंत नगरपरिषदेने पहिल्या तिमाहीत फक्त आस्थापना व आकस्मिक खर्चाव्यतिरिक्त अन्य खर्च केल्यास वैधानिक तरतुदीचे पालनात कुचराई केली म्हणून मुख्याधिकारी /संबंधित पदाधिकारी व नगरपरिषद अधिकारी यांना जबाबदार धरणेत येईल.

(भगवान सहाय)
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,